I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S. (पोलीस ठाणे):** पुसेगांव **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0051 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/03/2026 01:45 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 10/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 10/03/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:10 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:10 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 11/03/2026 **Time (वेळ):** 00:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2026 01:45 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 8 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,ता खटाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुप्रिया सुभाष गावडे

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1992 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देशमुख सिटी, रामकुंड सातारा, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | देशमुख सिटी, रामकुंड सातारा, सातारा शहर, सातारा, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7758082005

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र गणपत पवार | | | 1. Town/Village (शहर / गाव): अंबवडे,Tehsil (तहसील): ता खटाव,Police Station (पोलीस ठाणे): वडुज,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | अजित रामचंद्र पाटील | | | 1. Town/Village (शहर / गाव): खटाव,Tehsil (तहसील): ता खटाव,Police Station (पोलीस ठाणे): पुसेगांव,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | अनिल सदाशिव गुजर | | | 1. Town/Village (शहर / गाव): खटाव ता खटाव,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): पुसेगांव,District (जिल्हा): सातारा,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3 लाख रुपये | 3,00,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 3,00,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

खबरी जबाब दिनांक 11/03/2026

मी सुप्रिया सुभाष गावडे वय 34 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा रा. देशमुख सिटी, रामकुंड सातारा ता.जि.सातारा मोनं - 7758082005

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 09/03/2026 रोजी 17.30 वा चे सुमारास श्री. राजेश वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सातारा यांनी आम्हास समक्ष कळविले की, त्यांचे कक्षात हजर असलेले तक्रारदार संतोषकुमार धनसिंग कांबळे वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहयोगी प्राध्यापक, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता.खटाव जि.सातारा यांची ओळख करुन देवुन त्यांना सहायोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र देण्यासाठी चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा चे अध्यक्ष अजित पाटील तीन लाख रुपये लाच मागत असलेबाबत तक्रार असुन त्यांचे तक्रारीवर पुढील कायदेशीर कारवाई करा असे आम्हास आदेशित केले.

त्यानुसार आम्ही जी.एस.टी. विभाग सातारा येथील दोन शासकीय पंचांना पंच म्हणुन काम करणेसाठी उपस्थित राहणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार पंच म्हणुन 1. सतीश चंद्रकांत पाटील, राज्यकर निरीक्षक 2. प्रमोद विठ्ठल कांबळे, राज्यकर निरीक्षक हे उपस्थित राहीले. त्यावेळी आम्ही दोन्ही पंचांना सापळा पथकातील पोहवा ताटे, राजपुरे, मपोना जाधव, पोशि देशमुख यांची ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही पंच साक्षीदार यांना तक्रारदार श्री. संतोषकुमार कांबळे यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आहे त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास नमुद दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री. सतीश चंद्रकांत पाटील पंच क्र.2 म्हणून श्री. प्रमोद विठ्ठल कांबळे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लेखी स्वरुपात दिली ती पुढीलप्रमाणे. मी वरील प्रमाणे असुन मी चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था, खटाव अंतर्गत शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता.खटाव जि.सातारा

येथे मागील 21 वर्षापासुन नोकरीस आहे. सदर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अजित रामचंद्र पाटील हे आहेत. सदर संस्था शासन मान्यता प्राप्त असुन 100 टक्के अनुदानित आहे. शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे मी सध्या सहयोगी प्राध्यापक या पदावर दिनांक 01/03/2019 पासुन कार्यरत आहे. माझे शिक्षण एम.ए.पीचडी झाले असुन मला मराठी हिंदी इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे.

माझी सहयोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या पदावर स्थाननिश्चीती साठी दिनांक 10/03/2026 रोजी शिवाजी विद्यापीठामार्फत केंद्रीय पद्धतीने कॅस अंतर्गत मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असलेबाबत दिनांक 28/02/2026 रोजी विद्यापिठाकडील पत्रान्वये मला समजले. मी सध्या शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे सहयोगी प्राध्यापक या पदावर कार्यरत असुन माझे प्राध्यापक या पदावर स्थाननिश्चीती साठी माझी मुलाखतीकरिता निवड झाली आहे. सदर मुलाखतीच्या समितीचे अध्यक्ष हे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किंवा त्यांचे प्रतिनिधी असतात. सदर मुलाखतीस अध्यक्ष गैरहजर असतील तर मुलाखत घेतली जात नाही व संबंधीत शिक्षकास स्थाननिश्चीतीचे लाभ मिळत नाही हे मला माहिती आहे.

दिनांक 05/03/2026 रोजी चंद्राहार ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पंतसंस्था, मर्या, खटाव चे लिपिक रवि पवार हे मला भेटले व चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव चे अध्यक्ष अजित रामचंद्र पाटील यांनी भेटायला बोलविले असल्याचे सांगितले. त्यानुसार दिनांक 06/03/2026 रोजी मी व रवि पवार असे अजित रामचंद्र पाटील, अध्यक्ष, चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव यांना भेटणेसाठी त्यांचे खटाव येथील राहते घरी गेलो. त्यावेळी अध्यक्ष, अजित रामचंद्र पाटील यांनी मला माझे सहयोगी प्राध्यापक या पदावरून प्राध्यापक या पदावर स्थाननिश्चिती साठीचे मुलाखतीच्या समितीचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणेसाठी किंवा प्रतिनिधी पाठविणेसाठी तीन लाख रूपये द्यावे लागतील असे मला सांगून पैशाची जुळणी झाल्यानंतर पुढील चर्चा रवि पवार यांचेशी करण्यास सांगितले. मी त्यांना पैसे दिले नाहीत तर ते माझे सहयोगी प्राध्यापक या पदावरून प्राध्यापक या पदावर स्थाननिश्चिती साठीचे मुलाखतीच्या समितीचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार नाहीत किंवा प्रतिनिधी पाठविणार नाहीत म्हणून मी त्यांना नाईलाजाने होकार दिला. त्यावेळी ते माझ्याकडे मागणी करीत असलेली रक्कम ही लाच असल्याचे माझी खात्री झाली. परंतु त्यांना लाच देण्याची माझी अजिबात इच्छा नाही.

मी दिनांक 10/03/2026 रोजी रवि पवार यांचे समवेत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, अजित रामचंद्र पाटील यांचे खटाव, ता.खटाव, जि.सातारा येथील राहते घरी जावून भेट घेणार असून माझे कामाबाबत चर्चा करणार आहे. सदर चर्चेमध्ये त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास आपले विभागाकडून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी विनंती आहे.

चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा चे अध्यक्ष अजित रामचंद्र पाटील आणि माझ्यात कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत तसेच आमच्यात कोणतेही पुर्ववैमनस्य देखील नाही. तरी त्याचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. या मजकुराचा सहीचा तक्रारी अर्ज हजर केला. त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या.

तक्रारदार हे दिनांक 10/03/2026 रोजी खाजगी इसम रवि पवार व लोकसेवक अजित पाटील यांची भेट घेणार असल्याने तक्रारदार यांना दिनांक 10/03/2026 रोजी सकाळी 7.30 वा. मोरया लॉन्स मंगल कार्यालय खटाव येथे उपस्थीत राहण्याच्या सुचना दिल्या. तसेच दोन्ही पंचांना व सापळा

पथकास दिनांक 10/03/2026 रोजी 06.30 वा. पडताळणी कारवाई कामी ला.प्र.वि.सातारा कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.

दिनांक 10/03/2026 रोजी सकाळी 6.30 वा. आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह शासकीय वाहन क्रमांक एम एच 11 डी एच 8213 या वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे साहित्य घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथुन बाहेर पडुन कोरेगाव मार्गे खटाव येथे 7.30 वा. पोहोचलो. त्यावेळी शासकीय वाहन पोहवा ताटे हे चालवित होते. मोरया लॉन्स मंगल कार्यालय येथे तक्रारदार त्यांचेकडील मारुती सुझुकी अल्टो कार क्रमांक एम एच 11 बी एच 4175 सह हजर होते.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. संतोषकुमार कांबळे यांचेकडे लोकसेवक अजित पाटील हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तक्रारदार व पंच यांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. तसेच पोहवा ताटे यांचेकडील रिअलमी कंपनीचे मोबाईल मध्ये केडीएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड घातले सदर मोबाईल फोन मध्ये पडताळणी कारवाई, सापळा कारवाई वेळीचे निवेदन व लाच रक्कम व कागदपत्रे जप्तीचे छायाचित्रण करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 08.17 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार कांबळे व पंच क्र.1 सतीश पाटील पंच क्र. 02 प्रमोद कांबळे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन घेतले. सदर निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल मध्ये केले आहे. तक्रारदार व पंचांचे निवेदन घेतलेनंतर आमचे सुचनेवरुन पोहवा राजपुरे यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे जाणेसाठी पंच नंबर 1 यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनाने रवाना केले.

त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे मोरया लॉन्स मंगल कार्यालय खटाव येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 09.24 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 पाटील यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे गेलो तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 9822902253 वरुन लाउड स्पीकर ऑन करुन खाजगी इसम रवी पवार यांचे मोबाईल फोन नंबर 7588383183 वर फोन करुन "पवार सर" असे विचारले असता रवी पवार "हा बोला" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "आला का तुम्ही" असे विचारले असता रवी पवार यांनी "वेळ लागेल अजुन एक अर्धा पाऊन तास लागेल" असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार "व्हयं.. आव थोंड अर्जंट आला तर लय बर होईल" असे म्हणाले. त्यावर रवी पवार यांनी "झालीय का जुळणी" असे विचारले. त्यावर तक्रारदार "जुळणी..कमी हायतं..अडीच चीच झालीय" असे म्हणाले. तसेच "त्या संदर्भात म्हटंल काकांना भेटलो असतो आपण.. काय मार्ग निघतोय का बघीतला असता" असे

म्हणाले. तेव्हा रवी पवार हे "आता कुठं कॉलेजमध्ये" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "कॉलेजमध्ये आलोय... कॉलेजमध्येच" असे म्हणाले तेव्हा रवी पवार यांनी "पन्नास" असे विचारुन "हा पन्नास जुळाल्यात नाही का अजुन" असे विचारले त्यावर तक्रारदार "हा पन्नासच नाही झालं आणखीन.. त्यादिवशी काकांना म्हणल्यालो की नाय आपुन" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार तक्रारदार यांना "जावुन येताय का म्हटलं" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "नाय तुम्ही असल्यावर बर पडतं" असे म्हणाले. तसेच "फोन करा मग.. काय होतंय बघा." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी रवी पवार यांचेशी चर्चा करुन फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा रवी पवार यांना त्यांचे मोबाईल फोनवरुन फोन केला व "झाला का अध्यक्षांशी फोन" असे विचारले तेव्हा रवी पवार यांनी "नाही फोन बंद आहे काकांचा" असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी रवी पवार यांचेशी चर्चा करुन "ऐका ना पत्र तुमच्याकडे की अध्यक्षांकडे" आहे असे विचारले तेव्हा रवी पवार यांनी "काकांच्याकडे आहे असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार "आयला ती मला माहितीये ते पुर्ण तीन लाखाची रक्कम दिल्या शिवाय तुम्हांला काय वाटतं देतील का" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार हो म्हणाले. त्यावर तक्रारदार "तीन लाख.. आता पन्नास हजार... जावुया तरी पण विचारुन बघुया त्यांना" असे म्हणाले. त्यावर रवी पवार "बघा शक्य झालं तर" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "चालतय जातो मग खाली.. त्यांनी रागवु नाही गेल्यावरती असे म्हणाले. त्यावर रवी पवार हे "अं... दोन मीनटे मी सरांना फोन करुन बघतो... येलपल्ले सर हायत का तिथं येलपल्ले सर" असे म्हणाले. त्यानंतर थोडा वेळ थांबुन तक्रारदार यांनी पुन्हा रवी पवार यांना फोन केला व "विचारलं का ते येलपल्ले सरांना" असे विचारले. तेव्हा रवी पवार यांनी "नाही त्यांना पन फोन लागला नाहीये" असे सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी "होय मी जातो मग काकां कडे असे सांगीतले" तेव्हा रवी पवार यांनी "सोबत कोण आहे तुमच्या" असे विचारले. त्यावर तक्रारदार "कोण नाही आमचे पाहुने आहेत.. काल त्यांचेकडुन आणलेत फलटण वरुन पन्नास हजार" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी अजित पाटील यांचे फोनवर फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी रवी पवार यांना फोन करुन "अनिल गुजर आलेत का असे विचारले असता रवी पवार यांनी "नाहीत आले असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी चर्चा करुन फोन कट केला. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार यांना रवी पवार यांचा

फोन आला तेव्हा तक्रारदार "हा बोला की पवार सर" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार यांनी "गेलाय खाली तुम्ही" असे विचारले. त्यावर तक्रारदार "नाही नाही कॉलेजमध्ये हाय अनिल भी हाय, आण गणेश दोघंबी हायतं" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार यांनी "ठिक हाय ते पन्नास नाही का होणार आता" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "आपला प्रयत्न .. काका तर नाहीच म्हणले तर प्रयत्न करुन बघतो थोड्या वेळात चालूच आहेत. माझे प्रयत्न.. पन फक्त उशीर होईल म्हणुन म्हणतोय, जर होत असेल तेवढयात तर ठिक, प्रयत्न चालुच आहेत, आले तर देतोच की मी पन्नास वरचे पण" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी रवी पवार यांचेशी चर्चा करुन फोन कट केला. तेव्हा तक्रारदार यांना अनिल गुजर भेटले त्यावेळी तक्रारदार यांनी अनिल गुजर यांना "आलता फोन पवार सरांचा असे विचारले. तेव्हा अनिल गुजर यांनी "पवार सर नाहीत अजुन आले असे सांगीतले. तसेच "मी पुढं जातो.. काकांना अंघोळीला न्यायच होत..मग तुम्हाला लगीच फोन करतो" असे तक्रारदार यांना सांगीतले. तेव्हा तक्रारदार "आपन बरोबरच गेलो असतो इथ थांबलोय ती तिथे थांबलो असतो" असे

म्हणाले. त्यावर चर्चा करुन तक्रारदार "लगीच मला फोन करा.. ऐका की अनिलराव काय होतय जायला तिथ आता नउ वाजल्यात .. इथ आता कराडच्या पुढं पाहिजे होते." असे म्हणाले. त्यानंतर अनिल गुजर तेथुन निघुन गेले. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन अनिल गुजर यांचा मोबाईल फोन नंबर 8600881886 वर फोन केला व आहेत का येवु का असे विचारले. तेव्हा अनिल गुजर यांनी "नाहीत बाथरुममध्येच हायत" असे सांगीतले व "विचारल तर ते म्हणले पुर्णच करा" असे सांगीतले. त्यावर तक्रारदार "पुर्णच करा म्हणत्यात का" असे म्हणाले. त्यावर अनिल पवार हो असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "नव्ह तीनचे तीनच लाख करा म्हणत्यात" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांना आवाज येत नसल्याने त्यांनी फोन कट करुन पुन्हा फोन लावला व "सगळंच करा म्हणत्यात का" असे विचारले तेव्हा अनिल गुजर "हम्म" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "बर चालतय मग ऐकाना.. एक तासाभरात झाल तर पैसे कुणाकडे जमा करायचे" असे विचारले तेव्हा अनिल गुजर हा म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "त्यांना विचरा की पैसे कुणाकडे जमा करायचे" असे विचारले तेव्हा अनिल गुजर "बर बर विचारतो" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "हा झाल सगळं माझ प्रयत्न चालु आहेत झाल तर कुणाकडे जमा करायचे ते विचारा"असे म्हणाले. त्यावर अनिल गुजर "हे सगळंच देताय का" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "हा सगळंच झाल तर" असे म्हणाले. त्यावर गुजर "चालतय विचारुन लगीच तुम्हाला सांगतो" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी फोन कट केला . त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा रवी पवार यांना फोन केला. त्यावेळी तक्रारदार यांनी "अनिल गेलाय काकांकडे खाली" असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी चर्चा करुन रवी पवार यांना विचारले की "नाही.. ऐका ना मला ते नाही म्हणायच.. सगळं तीन लाख रुपयांच जर सगळं काम झाल तर आपल्याला काकांकडे जावे लागेल का" त्यावर रवी पवार नाही काय.. पत्र मिळेल तुम्हाला" असे म्हणाले. त्यानंतर चर्चा करुन तक्रारदार यांनी फोन ठेवला. त्यानंतर मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यावेळी तक्रारदार यांना पंचासमक्ष अनिल गुजर यांचे बाबत विचारणा केली असता त्यांनी अनिल गुजर हे शहाजीराजे महाविद्याल खटाव येथे ग्रंथालय परिचर असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 10/03/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांनी खाजगी इसम रवी पवार यांना पंच नंबर 1 यांचे समक्ष मोबाईल वर फोन केला असता खाजगी इसम रवी पवार यांनी तक्रारदार संतोषकुमार कांबळे यांना सहायोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष अजित पाटील यांचेसाठी तीन लाख रुपये लाचेची मागणी केली. तसेच पडताळणी कारवाई वेळी अनिल गुजर यांची भेट झाली त्यानंतर अनिल गुजर हे अजित पाटील यांचे घरी गेले त्यावेळी तक्रारदार यांनी अनिल गुजर यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता त्यांनी  असता त्यांनी तक्रारदार यांना संस्था अध्यक्ष अजित पाटील यांना लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न

झाले.

पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार यांची खाजगी इसम रवी पवार यांचेशी व संस्था अध्यक्ष अजित पाटील यांचेशी समक्ष भेट न झाल्याने पुन्हा पडताळणी कारवाईचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार दिनांक 10/03/2026 रोजी 10.26 वा. व्हॉईस रेकॉर्डर ऑन करुन पुन्हा तक्रारदार यांना पंच नंबर 1 यांचेसह खाजगी इसम रवी पवार यांची भेट घेणेकामी शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे रवाना केले. त्यानंतर आम्ही सापळा पथक पंच क्र.02 असे मोरया लॉन्स मंगल कार्यालय खटाव येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 10.57 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 पाटील यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे शहाजीराजे विद्यालय खटाव येथे गेलो तेव्हा तक्रारदार कांबळे यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन रवी पवार यांचे मोबाईल फोनवर फोन लावला व "खटावमधी हायत का ? या की, कॉलेजमधी या की," असे विचारले. तेव्हा रवी पवार यांनी "झाली का रक्कम जमा ?" असे विचारले. त्यावर तक्रारदार "रक्कम आणखीण येतेय, एक अर्धा तास लागेल आणखीण" असे म्हणाले व तुम्ही आता कुठयं ? असे विचारले. त्यावर रवी पवार "आहे की, कॉलेजच्या बाहेर आहे जरा." असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "मग आलोच कॉलेजमधी एकच मिनिटात, जरा पुसेगावला गेलो होतो, आलोच एका मिनिटात कॉलेजमधी" असे म्हणुन फोन कट केला त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा रवी पवार यांना फोन करुन "आलोय कॉलेजच्या गेटवरती" असे सांगीतले. थोडया वेळाने एक इसम तक्रारदार यांचेजवळ आले तेव्हा तक्रारदार त्यांना "या की गाडीत बसुन बोलु या की, इथं खटावला मग नंतर काय उशीर झालाय काय, माझ्यामुळं गडबड नाय ना झाली? आपण जावु काकांच्याकडं खाली खरच चला माझ्यासाठी एकदा" असे म्हणाले. तेव्हा मला ते रवी पवार असल्याचे समजले. तेव्हा रवी पवार "नाय, काकांचा फोन झाला की, झाल्याशिवाय नाय म्हटले" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "झाल्याशिवाय नाय का ? बरं मी एक रिक्वेस्ट पर्सनली केली तर काय म्हणत्यात ते तरी बघू, येवू आपण" असे म्हणाले. त्यावर रवी पवार "नाय झाली ती चर्चा, झाली ती चर्चा"असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "आयला माझं प्रमोशन जर साहेब बर का पवार सर कस होईल कोल्हापूरला जायचं प्रमोशन हाय,बर माणूस कोण दिला ? बर चालेल येतील ते पैशे येतात बर माणूस कोण दिलाया आपल्या बरोबर?" असे म्हणाले. त्यावर रवी पवार "येलपले साहेब" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "येलपले साहेब का? नुकसान होईल राव नाय गेल तर त्याच्या आयला बसा दोन मिनट गाडीत या चर्चा करू बसून करू चर्चा उभ राहून रस्त्यावर करण्यापेक्षा आपल नको, बसा पुढ या बसा या" असे म्हणाले. त्यानंतर रवी पवार तक्रारदार यांचे गाडीत मागच्या सिटवर येवुन बसले. तेव्हा तक्रारदार "मी खुप प्रयत्न करतोय, काल दोन लाख तुम्ही दिले म्हणून बर झालं तेवढ तरी मिळाले रात्री पन्नास हजार रुपये, हे मेहूणे आहेत चुलत मेव्हणे" असे म्हणाले. त्यावर रवी पवार बर म्हणाले. त्यावर तक्रारदार "फलटणच्या पुढ त्यांच गाव आहे तेथून आनुन त्यांना घेवून त्यांच कराडला काम आहे सोडतो म्हणलं त्यांना कराडला जाताना त्यांच्याकडून पन्नास आनलेत आणखी पन्नासची तयारी हाय पण कधी मिळतील ते सांगता येत नाही, तिथं विद्यापिठात नाही गेल तर राहिलय फक्त पत्रांमुळे राहीलयं पन्नास हजारासाठी काकांनी तेवढा विश्वास ठेवायाला पाहीजे होता अध्यक्षांनी माझ्यावरती" असे म्हणाले. त्यावर रवी पवार

"विश्वास ठेवायाला काय आता काकांच्या मनात काय हाय आपण नाय सांगू शकत" असे म्हणाले व मी पुण्याला जाणार होतो ते कॅन्सल केलय असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी "पत्र घेवून आलाय का ? काकांकडचं हायत पत्र" असे विचारले. त्यावर रवी पवार "काकांच्याकडं हायत" असे म्हणाले. त्यानतंर तक्रारदार यांनी रवी पवार यांचेशी त्यांना मिळणारे पत्राबाबत चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार "दोन लाख रोख आणि एक लाख रुपयांचा चेक हे जर झाल असतं ना सकाळी कालच पैसे तुमच्याकडे दिले असते, पण काल कळलं की सगळ रोखच पाहिजे मग पळापळ झाली" असे म्हणाले. त्यावर रवी पवार "याच्या आधी कधी आपण असं केल नाही ना, एकाला एक आणि एकाला एक असं होत म्हणुन परत चर्चा होती. तो विचार करुन मग, तसं नको करायला असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आता काय" असे विचारले तेव्हा रवी पवार यांनी "किती वेळ आहे तुमच ? अर्धा तासात होईल का? " असे विचारले. त्यावर तक्रारदार "हा अर्धा तासात होईल की, तुम्ही थांबा झालं, अर्ध्या मी काय म्हणतोय आता वाजलेत पावणे आकरा साडे आकरा वाजेपयैत थांबा, साडेआकरा वाजता झालं पैशाचं, पैसेच घेवुन जावु पण काकांची भेट बी घेवु आशिर्वाद बी घेतो. काकांचा, तीन लाख रुपये दिले म्हणुन आणि आम्ही जातो मग पैसे देवुन राऊत सर बी नको अन् तुम्ही नको, डायरेक्ट काकांकडेच जावु ना आपण" असे म्हणाले. त्यावर रवी पवार हे "पैसे काय खाली द्यायचे नाहीत सर काकांच्याकडं. पैसे इकडे ट्रान्सफर करावे लागतात अकौेंटला." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "मागच्या वेळेस घरी दिले होते काकांना पैसे" असे म्हणाले. त्यावर रवी पवार "दिले दिले" असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार "मला काकांना भेटायचय काय, काकांचे आशिर्वाद पण घ्यायचेत, कांबळे सर आम्ही येतो म्हणावं, अर्ध्या पाऊण तासात" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार "मला कॉल करा" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "नाय नाय, मी सांगतो बारा वाजेपर्यंत जर माझा कॉल आला बारा च्या आत पैसे झालेच तर.. नाहीतर मग आपलं कॅन्सलचं आहे आज म्हणायच. काय आता झालं झालं नुकसान, काय सहा महिने पुन्हा पुढे बघता येईल, पावणे अकरा वाजलेत" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी रवी पवार यांचेशी कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर मी व तक्रारदार तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन संस्था अध्यक्ष, अजित पाटील यांचे राहते घरी गेलो. राहते घराचे दरवाजामध्ये एक इसम उभा होता तो तक्रारदार यांना "का हो सर" असे म्हणाला. त्यावेळी मला ते अजित पाटील असल्याचे समजले. तेव्हा तक्रारदार "काका, एक रिक्वेस्ट करायची होती." असे म्हणाले. त्यावर अजित पाटील "काय?" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "ते तुम्ही म्हटल्यालं त्या दिवशी तेवढं जुळलं नायत." असे म्हणाले. त्यावर अजित पाटील हे "पवार सर येतील, त्यांची गाठ घ्या, पवार सरांना मी सांगितलयं, त्यांची गाठ घ्या." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार "बघा सहानुभुतीने करा काका विचार असे म्हणाले. त्यावर अजित पाटील "पवार सरांची गाठ घ्या की, चालतयं." असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार पुन्हा तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले ठिकाणी परत आलो. वगैरे हकीकत सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांना हकीकत विचारली असता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकुन ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक 10/03/2026 रोजी केले पडताळणी कारवाईमध्ये खाजगी इसम रवी पवार यांनी तक्रारदार संतोषकुमार कांबळे यांना सहायोगी

प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष अजित पाटील यांचेसाठी पंच नंबर 1 यांचे समक्ष तीन लाख रुपये लाचेची मागणी केली. तसेच पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार पंच नंबर 1 यांचेसह लोकसेवक अजित पाटील यांचे घरी गेले असता अजित पाटील, संस्था अध्यक्ष यांनी तक्रारदार यांना "पवार सर येतील, त्यांची गाठ घ्या, पवार सरांना मी सांगितलयं, त्यांची गाठ घ्या. असे म्हणुन खाजगी इसम रवी पवार यांचे तक्रारदार यांचेकडील लाच मागणीस प्रोत्साहन दिले. तसेच तक्रारदार कांबळे यांना खाजगी इसम रवी पवार यांनी तीन लाख रुपये लाच रक्कम घेवुन शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार संतोषकुमार कांबळे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार कांबळे यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम तीन लाख रुपये हजर केले. त्यानंतर पोशि देशमुख यांनी नमुद नोटा कोऱ्या कागदावर ठेवुन त्याचे फोटो काढले.

त्यानंतर आम्ही शासकिय वाहनामध्येे काळया पडदयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधारात दोन्ही पंचांना व तक्रारदार कांबळे यांना अंन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक पोहवा राजपुरे यांनी करून दाखवले. त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम मपोना जाधव यांना न्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिली. तेव्हा मपोना जाधव यांनी कापसाच्या बोळयाने चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस न्थ्रासीन पावडर लावली त्यानंतर लाच रक्कम एका कापडी पिशवीत ठेवुन सदर पिशवीचे वरील बाजुस अंथ्रासीन पावडर लावली. त्यांनतर मपोना जाधव यांनी सदर लाच रक्कम ठेवलेली पिशवी तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातील हॅन्डब्रेकचे वर ठेवली. त्यानंतर मपोना जाधव यांना सापळा पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या. तसेच तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर 11.49 वा. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार संतोषकुमार कांबळे त्यानंतर पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे सापळा निवेदन ध्वनीमुद्रीत केले. सापळा निवेदानाचे छायाचित्रण पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोन मध्ये केले आहे. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा राजपुरे यांनी व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांनी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लाऊन दिला. त्यानंतर तक्रारदार यांनी खाजगी इसम रवि पवार कोठे आहेत याची खात्री करण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन नंबर 9822902253 वरुन लाउड स्पीकर ऑन करुन खाजगी इसम रवी पवार यांचे मोबाईल फोन नंबर 7588383183 वर फोन केला व "पवार सर हॅलो" असे म्हणाले तेव्हा रवी पवार "हॅलो" म्हणाले. तेव्हा तक्रारदार त्यांना "एक दहाच मिनीटात आलो, कॉलेजच्या गेटवरती या झालय पैशाच जुळलय पत्र घेवुन या येतानी" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व रवी पवार यांचेत चर्चा झाली व रवी पवार बर बर असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व पंच नंबर 1 हे, तक्रारदार यांना मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहनातुन रवाना झाले. त्यांचेपाठोपाठ आम्ही, पंच नंबर 2, सापळा पथक असे मोरया

लॉन्स मंगल कार्यालय खटाव येथुन शासकिय वाहनातुन रवाना झालो. तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनाने पंच नंबर 1 यांना घेवुन शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे गेले. तक्रारदार हे महाविद्यालाचे गेटवर थांबुन राहीले त्यावेळी सापळा पथक महाविद्यालयाचे समोरील रोडवर कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून राहीले.

तक्रारदार व पंच क्र. 01 हे महाविद्यालयाचे गेटवर थांबुन असताना एक इसम येवुन तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात बसुन बाहेर आला. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे चारचाकी वाहनातुनच सापळा पथकास दिसेल असा लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला तेव्हा सापळा पथकातील अंमलदार, आम्ही व पंच नंबर 2 त्यांचेजवळ गेलो. तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 12.10 वा ची होती. तेव्हा आडोशास थांबुन राहीलेल्या सापळा पथकातील पोशि देशमुख व पोहवा राजपुरे यांनी खाजगी इसम रवी पवार यांचा अनुक्रमे डावा व उजवा हात कोपराजवळ पकडला ती वेळ 12.11 वा ची होती. त्यावेळी रवी पवार यांचे हातात लाच रक्कम असलेली पिशवी होती. तेव्हा आम्ही रवी पवार यांना स्वतःची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव रविंद्र गणपत पवार, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी लिपीक नेमणुक चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षक संस्थेच्या सेवकांचे सहकारी पतसंस्था शाखा खटाव रा. अंबवडे ता.खटाव जि.सातारा असे असल्याचे सांगीतले.

त्यांनतर आमचे सुचनेवरुन पंच नंबर 2 यांनी खाजगी इसम रवींद्र पवार यांचे हातात असलेली लाच रक्कम ठेवलेली कापडी पिशवी ताब्यात घेतली. त्यावेळी पंच नंबर 2 यांनी लाच रकमेच्या नोटांची पडताळणी केली असता त्या सापळापुर्व कारवाई वेळी नमुद केलेप्रमाणे बरोबर असल्याचे सांगीतले. त्यानंतर खाजगी इसम रविंद्र पवार यांना घेवुन शहाजीराजे महाविद्यालयातील तीन नंबरचे खोलीत गेलो त्यावेळी यापुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोहवा ताटे यांनी व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. शहाजीराजे महाविद्यालयातील तीन नंबरचे खोलीत जावुन लाईट बंद करुन कृत्रीम अंधारामध्ये रविंद्र पवार यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी केली असता रविंद्र पवार यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस, बोटांच्या पेऱ्यावर निळसर चकाकी दिसुन आली. तसेच हस्तगत केलेल्या तीन लाख रुपये लाच रकमेस तसेच कापडी पिशवीस आत व बाहेरील बाजुस अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच पंच क्र.02 यांचे हातासही न्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर तक्रारदार यांचे हाताची तपासणी केली असता त्याचे उजवे हातास न्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर रविंद्र पवार यांना तक्रारदार यांचे कामाबाबतचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांना देण्यात येणारे पत्र हे संस्था अध्यक्ष अजित पाटील यांचेकडे त्यांचे राहते घरी असल्याचे सांगीतले. त्यानुसार आम्ही, तक्रारदार, पंच, सापळा पथक असे खाजगी इसम रविंद्र पवार यास घेवुन अजित पाटील यांचे राहते घरी गेलो. त्यावेळी तेथे अध्यक्ष अजित पाटील व अनिल गुजर उपस्थित असलेबाबत तक्रारदार यांनी सांगीतले. त्यावेळी अजित पाटील यांचेकडे तक्रारदार यांना सहायोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र मिळुन आले सदर पत्र दोन्ही पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले. सदरवेळी पोहवा ताटे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये लाच रक्कम जप्तीचे, तसेच कागदपत्रे जप्तीच्या कारवाईचे छायाचित्रण केले आहे.

तेव्हा आम्ही अजित पाटील यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव अजित रामचंद्र पाटील, वय 59 वर्षे, अध्यक्ष चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा रा. खटाव ता.खटाव जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांना पंचासमक्ष सापळा कारवाईची माहीती देवुन ताब्यात घेतले. तसेच अजित पाटील यांचे घरात उपस्थित असलेल्या अनिल गुजर यांना त्यांचे नाव व पदाबाबत माहीती विचारली असता त्यांनी त्यांचे नाव अनिल सदाशिव गुजर वय 42 वर्षे, व्यवसाय नोकरी - ग्रंथालय परिचर, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता.खटाव जि.सातारा रा. भोसरे ता.खटाव जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांना पंचासमक्ष सापळा कारवाईची माहीती देवुन ताब्यात घेतले.

त्यानंतर सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह औंध येथे जावून करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. शासकीय विश्रामगृह औंध येथे आम्ही पंच नंबर 1 यांना घडलेल्या हकीकतीविषयी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातुन शहाजीराजे महाविद्यालय खटाव चे गेटसमोर गेलो असता तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोनवरुन रविंद्र पवार यांचे मोबाईल फोनवर फोन केला व या की गेटवरती आलोय" असे म्हणाले. तेव्हा रविंद्र पवार यांनी "अं तिथ राऊत सर आलेत का" असे विचारले तेव्हा तक्रारदार "राऊत सर कशाला तुम्ही या की" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार यांनी मिटींग सुरु असल्याचे सांगीतले. त्यानंतर थोडया वेळाने रवी पवार हे महाविद्यालयाचे गेटवर आले. त्यावेळी तक्रारदार त्यांना "याकी, काकांकड, काकांकड जायचं" असे म्हणाले. त्यावेळी रवी पवार हे "नाय नाय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी पत्र असे विचारले असता रवी पवार यांनी "देतो की" असे सांगीतले. त्यावर तक्रारदार "या आत बसा की, पैसे तर घ्याकी मोजून" असे म्हणाले. त्यावेळी मी चारचाकी वाहनात मागील सिट वर जावुन बसलो. रविंद्र पवार हे तक्रारदार यांचे शेजारील सिटवर येवुन बसले. त्यावेळी तक्रारदाराने लाच रक्कम ठेवलेली पिशवी उजव्या हाताने उचलुन घेवुन रवी पवार यांना दिली व पैसे असे म्हणाले. तेव्हा रवी पवार हे त्यांचे मोबाईल फोनवर बोलत असल्याने तक्रारदार त्यांना "ठिवा, मोबाईल ठिवा, मोजून बघा पैसे" असे म्हणाले. तेव्हा रवी पवार यांनी लाच रक्कम असलेली पिशवी दोन्ही हाताने उचलुन घेवुन पिशवी उघडुन आतमध्ये पैसे असल्याची खात्री केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे डोक्याचे केसावरुन डावा हात दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने रवी पवार यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना हकीकत विचारता त्यांनीही पंच नंबर 1 यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगीतली.

यातील तक्रारदार संतोषकुमार धनसिंग कांबळे वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहयोगी प्राध्यापक, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता.खटाव जि.सातारा यांनी दिनांक 09/03/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 10/03/2026 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई वेळी शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे तक्रारदार यांना खाजगी इसम रविंद्र गणपत पवार, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी लिपीक नेमणुक चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षक संस्थेच्या सेवकांचे सहकारी पतसंस्था शाखा खटाव रा. अंबवडे ता.खटाव जि.सातारा यांनी तक्रारदार यांचे सहायोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र देण्यासाठी चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव

ता.खटाव जि.सातारा चे अध्यक्ष अजित रामचंद्र पाटील, वय 59 वर्षे, अध्यक्ष चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा रा. साईबाबा मंदिराजवळ,खटाव ता.खटाव जि.सातारा यांचेसाठी तीन लाख रुपये लाचेची मागणी पंच नंबर 1 यांचे समक्ष केली. तसेच तीन लाख रुपये लाच रक्कम सापळा कारवाई वेळी शहाजीराजे महाविद्यालय खटावचे गेटसमोरील रोडवर तक्रारदार यांचे चारचाकी वाहनात पंच नंबर 1 यांचे समक्ष स्विकारली आहे. तसेच दिनांक 10/03/2026 रोजी करण्यात आले पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार संतोषकुमार कांबळे यांनी सहायोगी प्राध्यापक या पदावरुन प्राध्यापक या स्थाननिश्चीतीसाठी कमीटीचे चेअरमन म्हणुन शिवाजी विद्यापीठात उपस्थित राहणेकरीता किंवा प्रतिनीधी नियुक्तीचे पत्र देण्यासाठी संस्था अध्यक्ष अजित रामचंद्र पाटील, वय 59 वर्षे, अध्यक्ष चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा रा. खटाव ता.खटाव जि.सातारा यांची त्यांचे राहते घरी पंच नंबर 1 यांचे समक्ष भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रकमेबाबत विचारणा केली असता अजित पाटील यांनी तक्रारदार यांना पवार सर येतील, त्यांची गाठ घ्या, पवार सरांना मी सांगितलयं, त्यांची गाठ घ्या. असे म्हणुन रवी पवार यांनी तक्रारदार यांचेकडे केलेल्या लाच मागणीस प्रोत्साहन दिले आहे. तसेच पडताळणी कारवाई वेळी तक्रारदार संतोषकुमार कांबळे यांनी अनिल सदाशिव गुजर वय 42 वर्षे, व्यवसाय नोकरी ग्रंथालय परिचर, शहाजीराजे महाविद्यालय खटाव ता.खटाव जि.सातारा रा. भोसरे ता. खटाव जि.सातारा यांची भेट घेतली तसेच मोबाईल फोनवर फोन करुन चर्चा केली असता अनिल गुजर यांनी तक्रारदार यांना चंद्रहार पाटील ग्रामीण शिक्षण संस्था खटाव ता.खटाव जि.सातारा चे अध्यक्ष अजित पाटील यांना लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिले आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अ, 12 प्रमाणे फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SANDEEP ASHOK POMAN (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SANDEEP ASHOK POMAN

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402SAPM8901W

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | **चेचक:** क्र. |
| 3 | पुरुष | 1990 | | - | | **चेचक:** क्र. |

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

| Deformities / Peculiarities (व यंग / वैशिष टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल याच ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त यापेक्षा अधिक तपशील दिल यास फक त यातील रकान यांची नोंद घेतली जाईल)**